प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, मुंबई यांना कार्यालयीन कामकाजाकरीता एक नविन शासकीय वाहन खरेदी करण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांक : कौटुंन्या १११८/प्र.क्र.९८/का-नऊ
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,
दिनांक: ०६ ऑगस्ट, २०१९

वाचा :

१) प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, मुंबई यांची पत्रे क्र.Adm/७७७/२०१८, दि.१२.०४.२०१८, क्र.OW/FC/CM/५३७/२०१८, दि.०१.०८.२०१८, क्र.म.जा.क्र./एडीएम/२८/१९, दि.१०.०१.२०१९ व क्र. Adm/५४३/२०१९, दि.१२.०३.२०१९

२) विधि व न्याय विभाग शासन निर्णय क्र. कौटुंन्या १११५/प्र.क्र.१७८/का. नऊ, दि.२०.१२.२०१६

३) वित्त विभाग शासन निर्णय क्र. वाहन-२०१६/प्र.क्र.५१/१६/विनियम, दि.२१.०१.२०१७

प्रस्तावना :

राज्यातील कौटुंबिक न्यायालयांच्या वाहन आढाव्याअंती कौटुंबिक न्यायालय, मुंबई यांना ३ वाहने अनुज्ञेय करण्यात आली होती. कौटुंबिक न्यायालय, मुंबई येथे ३ वाहने उपलब्ध होती तथापि प्रमुख न्यायाधीश यांचेकरीता वापरात असलेले वाहन क्र.०२-जेपी-८७०५ निर्लेखित करण्यात आले आहे. त्यामुळे सदर वाहनाच्या बदल्यात एक नविन शासकीय वाहन खरेदीचा प्रस्ताव संदर्भ क्र.१ येथील पत्रान्वये कौटुंबिक न्यायालय, मुंबई यांचेकडून शासनास प्राप्त झाला होता. त्यानुसार कौटुंबिक न्यायालय, मुंबई करीता जुन्या वाहनाबदली एक नविन शासकीय वाहन खरेदी करण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

कौटुंबिक न्यायालय, मुंबई येथील प्रमुख न्यायाधीश यांचे कार्यालयीन वापराकरीता एक नविन शासकीय वाहन खरेदी करण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मंजुरी देण्यात येत आहे.

(अ) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.२४.०८.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट-ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपद्धती, राज्य शासनास वस्तु व सेवा खरेदी करण्यासाठी स्विकृत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार राज्य शासनास वस्तु व सेवा खरेदीसाठी GeM Portal ची कार्यपद्धती विचारात घेणे बंधनकारक आहे, तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.०१.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे खरेदीची सुधारित नियमपुस्तिकेतील कार्यपद्धतीची विचारात घेणे आवश्यक आहे. सदर शासन निर्णयांच्या तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

(ब) वित्त विभाग संदर्भ क्र. ३ येथील दिनांक २१/०१/२०१७ च्या शासन निर्णयानुसार राज्यस्तरीय वाहन आढावा समितीच्या मान्यतेने वाहन अनुज्ञेय केलेले इतर अधिकारी यांना रु. ६.०० लक्षच्या मर्यादेत वाहनाची खरेदी करण्यात यावी. वाहन खरेदीसाठी मंजूर केलेल्या अनुदानामध्ये वाहनाच्या किंमतीमध्ये सर्व करांचा समावेश आहे.

(क) अनुज्ञेय वाहन खरेदी करताना आपल्या कार्यक्षेत्रात सदर वाहनाच्या देखभाल व दुरुस्तीची सुविधा तसेच, वाहनाच्या सुट्या भागांची (Spare Parts) उपलब्धता समाधानकारक असल्याची खातरजमा करावी.

(ड) बदली वाहन खरेदी केल्याचा दिनांकापासून २ महिन्यांच्या आत निकालात काढावयाच्या वाहनांची तदनुषंगिक सूचनांच्या आधारे लिलावाद्वारे विल्हेवाट लावण्यात यावी.

(इ) नवीन वाहन ज्या अधिका-यास मंजूर करण्यात आले आहे, त्या अधिका-याकडूनच त्याचा वापर त्याच कार्यालयाकरीता, शासकीय कामकाजासाठीच करण्यात यावा, अन्य अधिका-यांकडे हस्तांतरीत करण्यात येऊ नये.

(ई) सदर अधिका-यानी वाहन खरेदी केल्याचा अनुपालन अहवाल वाहन क्रमांकासहित शासनास सादर करावा.

२. याकरीता येणारा खर्च "मागणी क्र.जे-१, २०१४, न्यायदान-१०५ दिवाणी व सत्र न्यायालये-(०१)(०२) प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, सांकेतांक २०१४ ०३४१, १३-कार्यालयीन खर्च या लेखाशीर्षाखाली" सन २०१९-२०२० या वर्षासाठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. प्रस्तुत शासन निर्णय हा वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.३८/२०१९/विनियम, दि.२२.०१.२०१९ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०७१५२४२३८७१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Amogh Shyamkant Kaloti

Digitally signed by Amogh Shyamkant Kaloti
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f733daf00a6028414c43d0cc10d82acab3b732c4edd56e818f8a3b355588753, serialNumber=9ebeebf21dc54ceec51e6d5ffc84bb94ca6af89497279007d66e97dc13547037, cn=Amogh Shyamkant Kaloti
Date: 2019.08.07 15:30:08 +05'30'

(अ. श्या. कलोती)
विधि सल्लागार-नि-सह सचिव

प्रति :- १) मा. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई,
२) प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय , मुंबई,
३) महालेखापाल -एक/दोन (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
५) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
६) वित्त विभाग/व्यय-५/विनियम
७) विधी व न्याय विभाग कार्यासन-२३,२४,२५
८) निवडनस्ती